# मुंबई विद्यापीठ

REG/ISD/2019-20/29

## परिपत्रक

विषय : राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड–१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय

संदर्भ: १) सार्वजनिक आरोग्य विभाग, पत्र क्र. करोना–२०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य–५, दिनांक १४/०३/२०२०

२) सार्वजनिक आरोग्य विभाग, पत्र क्र. करोना–२०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य–५, दिनांक १५/०३/२०२०

३) शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकिर्ण–२०२०/प्र.क्र. ६०/२०/ताशि–१ दि. १६/०३/२०२०

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. समय–२०२०/ प्र.क्र. ३५/१८ (र.व का.) दिनांक १८/०३/२०२०

५) संकिर्ण–२०२०/ प्र.क्र. ६०/२०/ता.शि.–१ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन दिनांक १९/०३/२०२०

६) D.O. No. Secy (HE)/MHRD/2020 New Delhi dtd. 21 March, 2020

उपरोक्त संदर्भाकिंत पत्राच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये, विद्यापीठ उपपरिसरे, आदर्श महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था व विद्यापीठ शैक्षणिक विभागाकरिता संदर्भाधिन परिपत्रक क्र. १ ते ५ अन्वये विद्यापीठाने कोरोना विषाणूच्या प्रसारावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत वेळोवेळी परिपत्रके निर्गमित केली आहेत व उपरोक्त परिपत्रकातील दिशा निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्याचे देखिल सुचित केले होते.

सचिव, मानव संसाधन विकास मंत्रालय (उच्चतर शिक्षा विभाग, उच्च शिक्षण विभाग), भारत सरकार, नवी दिल्ली यांचे उपरोक्त संदर्भ क्र. ६ अन्वये प्राप्त निर्देशानुसार कोरोना विषाणूचे देशाभरातील वाढते संक्रमण रोखण्यासाठी व देशभरातील शिक्षण संस्थांमध्ये शिक्षक/संशोधक/अधिकारी/शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना अंकित केल्या आहेत.

उपरोक्त संदर्भाधिन पत्र क्र. ६ च्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठातील विविध प्रशासकीय विभाग/ विद्यापीठ उपपरिसरे/ मान्यता प्राप्त सर्व संस्था व विद्यापीठ शैक्षणिक विभाग यांना सुचित करण्यात येते की दिनांक २३ मार्च, २०२० ते ३१ मार्च, २०२० चे दरम्यान शिक्षक/संशोधक/अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी आपले घरी राहून (Work from Home)

संबंधित विभागाचे कामकाज करावे. तद्वतच, शिक्षक व संशोधकांनी हा काळ online containt विकसित करणे, online अध्यापन व online मुल्यमापनाकरिता उपयोगात आणावा. **तद्वतच पुढील सत्र/शैक्षणिक वर्षाकरिता शैक्षणिक साहित्य तयार करणे, संशोधन लेख, संशोधन पेपर व संशोधना संदर्भात इतर आवश्यक कार्यवाही करावी. याशिवाय नाविन्यपूर्ण प्रश्नसंचयनी (Question Bank) व एक भारत; श्रेष्ठ भारत व इतर महत्वाच्या विषयांवर नाविन्यपूर्ण प्रकल्प तयार करण्यासंदर्भात कार्यवाही करावी.** उपरोक्त कालावधी हा शिक्षक (तदर्थ व कंत्राटी शिक्षक देखिल) संशोधक/अधिकारी/शिक्षकेत्तर कर्मचा—यांचा कर्तव्य कालावधी (On Duty) म्हणून ग्राहय धरण्यात येईल. विद्यापीठातील वसतिगृहात अद्यापही वास्तव्याला असलेल्या विद्यार्थ्यांना, विशेषत्वाने विदेशी विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्येच वास्तव्य करण्याची अनुमती देण्यात यावी व कोरोना विषाणूच्या संक्रमणापासून सुरक्षित राहण्याकरिता प्रतिबंधात्मक उपायां संदर्भात आवश्यक ती सर्व खबरदारी घेण्याबाबत त्यांना सल्ला देण्यात यावा.

आपत्कालीन परिस्थितीमध्ये संपर्क साधण्याच्या दृष्टीने सर्व शिक्षक, संशोधक, अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी स्वत:चे भ्रमणध्वनी क्रमांक, ईमेल आयडी व संपर्क पत्ता संबंधित विभाग प्रमुखांकडे सादर करावा. अत्यावश्यक सेवा (सुरक्षा विभाग, अभियांत्रिकी विभाग, पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा व इतर सेवा) पुरविणा—या प्रशासकीस विभाग प्रमुखांनी या बाबत त्यांचे स्तरावर योग्य ते नियोजन करावे.

मुंबई
२२ मार्च, २०२०

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव

प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाही करीता :—
सर्व प्रशासकीस विभाग प्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख, प्रभारी संचालक उपपरिपरे, समन्वयक, आदर्श महाविद्यालये, सुरक्षा अधिकारी आणि अभियांत्रिकी विभाग